आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार, दिनांक २२ सप्टेंबर २०२४

<u>ठळक बातम्या</u>

1. मारवाडी फाउंडेशनतर्फे दिला जाणारा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान.

2. आगामी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला बारा जागा देण्याची केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची महायुतीकडे मागणी; तर महाविकास आघाडी तर्फे पुढील आठवड्यात जाहीर केले जाणार उमेदवार.

3. 'स्वच्छता-ही-सेवा' अभियाना अंतर्गत नागपूर महानगर पालिकेच्या वतीनं आयोजित स्वच्छता दौड मध्ये २००० नागरिकांचा सहभाग.

4. विदर्भात २६ सप्टेंबरपर्यंत मेघगर्जनेसह वादळाचा यलो अलर्ट हवामान खात्याकडून जारी, यवतमाळ आणि गडचिरोली इथं आज मुसळधार पावसाची शक्यता.

****

<u>आठवले पुरस्कार</u>

दलित शोषित समाजाला न्याय देण्याचं काम, रामदास आठवले यांनी केलं असून, दलित चळवळीचं रूपांतर आर्थिक विकासाच्या चळवळीत होण्यासाठी, आठवलेंनी पुढाकार घेतला असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरमध्ये केलं. मारवाडी फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री, रामदास आठवले यांना आज गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. फाउंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. पाच लाख रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. 'दलित पँथरसारख्या अन्याया विरोधात विद्रोहाची भूमिका मांडणाऱ्या कार्यकर्त्यांच्या, साहित्यिकांच्या चळवळीतून आपण पुढे आलो असून, आम्हाला समाजामध्ये व्यवहारिक आंबेडकरवाद रुजवायचा आहे' असं प्रतिपादन आठवले यांनी सत्काराला उत्तर देतांना केलं. 'बौद्ध समाजात अनेक गट आहेत. अनेक दलित गट सुद्धा आपल्या सोबत नाहीत त्यामुळे आपली ताकद वाढवण्यासाठी, इतर जातीधर्मांच्या लोकांना आपल्याजवळ आणण आवश्यक असल्याचं मत रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केलं. बाबासाहेबांच्या नावाचा पुरस्कार मिळणे हे माझे भाग्य असून, त्यांच्या विचारांसाठी काम करणाऱ्या इतरही जातीतील लोकांचा, या पुरस्कारासाठी विचार व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

आठवले पत्रकार परिषद

दरम्यान आज सकाळी झालेल्या पत्रकार परिषदेत विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या तिन्ही पक्षांनी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाला प्रत्येकी चार अशा एकूण बारा जागा द्याव्यात अशी मागणी रामदास आठवले यांनी केली. विदर्भात उत्तर नागपूर, उमरेड, उमरखेड, वाशिम अशा तीन ते चार जागा आपण मागणार असल्याचं आठवले यांनी सांगितलं. राज्यातील एकूण जागा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया स्वतःच्या चिन्हावर लढणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

मविआ जागा वाटप

आगामी विधानसभा निवडणूक काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे तिन्ही पक्ष महाविकास आघाडी म्हणून, एकत्र येऊन निवडणूक लढवणार आहेत. पुढील आठवडाभरात हे पक्ष आपले उमेदवार जाहीर करतील असं, शरद पवार यांनी बारामतीत पत्रकारांशी बोलताना सांगितलं. आरक्षण प्रश्नाशी संबंधित घटकांनी, सामंजस्याची भूमिका घेण्याची गरज असून, सरकारनं देखील याबाबत विलंब लावू नये, लोकांना विश्वासात घेऊन कार्यपूर्तता करावी असं पवार म्हणाले.

'रिन्यू डिसइन्व्हेस्टमेंट'

सुमारे ३ हजार रोजगार निर्मितीची क्षमता असलेली रिन्यू पॉवर लिमिटेडची १८ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक गुजरातमध्ये हलवण्यात आली असल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे. विरोधकांच्या अशा वक्तव्यामुळे महाराष्ट्राची प्रतिमा मालिन होत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. रीन्यू कंपनीने देखील विरोधकांचे हे दावे स्पष्टपणे फेटाळले आहेत. कोणतेही प्रकल्प महाराष्ट्राबाहेर हस्तांतरित करण्यात आलेले नाहीत, असा पुनरुच्चार फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना केला आहे.

100 दिवस-केंद्र सरकार

केंद्रातील एन.डी.ए.सरकारनं ऐतिहासिक तिसऱ्यांदा सत्तेवर आल्यानंतर पहिले शंभर दिवस पूर्ण केलेत. या काळात सरकारनं, पायाभूत सुविधा, समाजकल्याण, शेतकरी, मध्यमवर्ग, महिला आणि तरुणांवर लक्ष केंद्रित करून, पंधरा लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू केले आहे. शहरातील झाडांचं प्रमाण वाढविण्यासाठी, 100 दिवसांच्या कृती आराखड्यात, शंभर नगर व्हॅनच्या ऐवजी 111 नगर व्हॅनला सरकारनं मंजुरी दिली आहे. राष्ट्रीय नुकसान भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरणाच्या राष्ट्रीय निधीच्या सहाय्यानं, २०२७ पर्यंत एक हजार नगर व्हॅन विकसित करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

## मानवाधिकार आयोग

पुण्यातल्या एका खासगी कंपनीत काम करणाऱ्या मुलीनं अतिरीक्त कामाच्या दबावाला कंटाळून, आत्महत्या केली होती. या घटनेची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं स्वतःहून दखल घेतली आहे. याप्रकरणी श्रम आणि रोजगार मंत्रालयानं तपास करून चार आठवड्यात अहवाल द्यावा अशी सूचना, आयोगानं केली आहे.

पीडित मुलगी केरळची रहिवासी असून, ती कंपनीत चार्टड अकाऊंट म्हणून कार्यरत होती. या घटनेवर मानवाधिकार आयोगानं चिंता व्यक्त करत, खासगी कंपन्यांमध्ये जागतिक मानवी हक्क अधिकारांचं योग्य पद्धतीनं पालन केलं जात आहे की नाही, याचा आढावा घेण्याच्या सूचनाही, श्रम आणि रोजगार मंत्रालयाला केल्या आहेत.

## वर्षावास

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या, शासकीय निवासस्थानी आज वर्षावास या पवित्र महिन्या निमित्त, भंतेजींसाठी चिवरदान, धम्मदान आणि भोजनदान कार्यक्रम पार पडला. राज्यभरातून भिक्षू महासंघांचे भंतेजी या कार्यक्रमासाठी आले होते.प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवाद आणि सामूहिक प्रार्थना करण्यात आली. ऑल इंडिया भिक्षू महासंघाचे कार्यकारी अध्यक्ष, भदंत डॉ.उपगुप्ता महाथेरोही यावेळी उपस्थित होते.

## स्वच्छता दौड

'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' या संकल्पनेस अनुसरून, केंद्र सरकारच्या स्वच्छता-ही-सेवा या अभियांतर्गत, नागपूर महानगरपालिकेच्या वतीनं मनपा मुख्यालय सिव्हिल लाईन्स इथं, आज सकाळी स्वच्छता-दौडचं आयोजन करण्यात आलं होतं. मनपा आयुक्त आणि प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी, नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांसह, अन्य पदाधिकाऱ्यांनी हिरवा झेंडा दाखवित स्वच्छता दौडची सुरूवात केली. या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांपासून लहान मुले, युवा वर्ग, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्थांच्या स्वयंसेवकांनी मिळून, नागपूर शहराला स्वच्छ, सुंदर आणि स्वस्थ साकारण्याचा निर्धार केला. सात वर्षाच्या मुलांपासून ते ७६ वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत, साधारणतः २,००० नागरिक या दौडमध्ये सहभागी झाले होते. या दौडमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय विजयी स्पर्धकांचा, मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. त्याच प्रमाणे दौडमध्ये सहभाग नोंदविणाऱ्या जेष्ठ नागरिक, स्वयंसेवी संस्था आदींचा देखील गौरव करण्यात आला.

*मै सभी नागपुर के वासियोंको भी आवाहन करता हु की, हमारी सिटी 'स्वच्छ और सुंदर बनाने के लिए एक जो स्लोगन इस उपक्रम का है 'स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता' उसका हम सभी ने ध्यान में रखना चाहिए और सिर्फ स्लोगन नहीं इसको हमने इम्प्लीमेंट करना चाहिए । सभी लोग अगर हम कंट्रीब्यूट कर पाए तो ही हम हमारी सिटी जो है एक स्वच्छ और सुन्दर, एक वर्ल्डक्लास सिटी बना पाएंगे ।*

पीक पाहणी

सोयाबीन पीक नुकसानीच्या अनुषंगानं पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी, अकोला जिल्ह्यातील शिवापूर इथं पाहणी केली. यावेळी त्यांनी, शिवापूर गावातील शेतकरी बांधवांशी संवाद साधून, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शासन शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे. नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना सर्वतोपरी मदत करण्यात येईल अशी ग्वाही, त्यांनी यावेळी दिली. दरम्यान, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठामध्ये, तीन दिवसीय शिवार फेरीच्या कार्यक्रमाचं आयोजन, करण्यात आलं होतं. अकोला इथं आज झालेल्या समारोपीय कार्यक्रमात राज्याचे महसूल मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री, राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सहभाग घेऊन, पीक प्रात्यक्षिकांची पाहणी केली.

जागतिक नदी दिवस

आज जागतिक नदी दिन. सप्टेंबर महिन्याचा चौथा रविवार, जगभर नदी दिवस म्हणून साजरा केला जातो. मनुष्य जीवनात नदीची मुलभूत उपयुक्तता दर्शवण्यासाठी या दिनाचं महत्व आहे.

हडपक्या गणपती

विदर्भात अनेक ठिकाणी हडपक्या गणपती उत्सव साजरा करण्यात येत आहे. श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले ऊर्फ चिमणाबापू यांनी, इ.स.१७८७ पासून मस्क्ऱ्या किंवा हडपक्या गणपती उत्सवाची सुरुवात केली. त्यानुसार ही परंपरा आजही कायम असून, महाराजा ऑफ नागपूर स्ट्रटच्या वतीनं, थाटामाटात हा उत्सव साजरा करण्यात येतो. यंदा याला २३७ वर्ष पूर्ण होत असून, काल नागपूरच्या सिनियर भोसला पॅलेस इथं, या गणरायाची स्थापना झाली. राजे खंडोजी महाराज भोसले हे बंगालच्या स्वारीवर होते. बंगालवर विजय मिळवून परत येत असताना कुळाचारी गणपतीचं विसर्जन झालं. बंगालवर विजय मिळविण्याचा आनंद साजरा करण्याकरिता, या गणपतीची स्थापना करून त्यात विविध नकला, लावण्या, खडी गंमत यासारख्या कार्यक्रमांचं आयोजन करून, हा आनंदोत्सव साजरा करण्याची परंपरा तेव्हा पासून सुरु झाली ती आजता गायत कायम

आहे. आज विदर्भात सार्वजनिक स्वरूपात अनेक ठिकाणी मस्कऱ्या गणपतीची स्थापना करण्यात येते.

<u>हवामान</u>

वाशिम जिल्ह्यामध्ये दोन आठवड्याच्या विश्रांतीनंतर काल रात्री साडेअकरा वाजता, वाशिम आणि मालेगाव तालुक्यात विविध ठिकाणी विजेच्या कडकडाटासह प्रचंड पाऊस झाला. या पावसानं शेतात सोंगून ठेवलेल्या सोयाबीनचं प्रचंड नुकसान झालं असून या नुकसानीचा पंचनामा करून ताबडतोब मदत द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. मागील चोवीस तासांत वाशीम, यवतमाळ, वर्धा, गोंदिया आणि नागपूर इथं अनेक ठिकाणी पावसाची नोंद झाली आहे. हवामान खात्यानं विदर्भातील सर्व जिल्ह्यांसाठी २६ तारखेपर्यंत विजांचा कडकडाट आणि वादळाचा येलो अलर्ट जारी केला आहे. या दरम्यान, आज यवतमाळ आणि गडचिरोली इथं तर उद्या चंद्रपूर आणि गडचिरोली इथं मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

******